भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/१०५
डीसीएम(सीसी)क्र. जी - २/०३.३५.०१/२०१२-१३ जुलै २, २०१२

१) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी
(करन्सी चेस्ट असलेल्या सर्व बँका)

२) राजकोषाचे संचालक
(सोबत जोडलेल्या राज्य सरकारांच्या यादीप्रमाणे)

महोदय/महोदया,

**महापरिपत्रक - करन्सी चेस्ट व्यवहारांबाबत विलंबाने रिपोर्ट पाठविणे/चुकीचे रिपोर्टिंग/रिपोर्टिंग न करणे आणि करन्सी चेस्टमधील शिल्लकेमध्ये अपात्र रकमा समाविष्ट करणे ह्याबाबत दंडात्मक व्याज आकारणे.**

करन्सी चेस्ट व्यवहारांबाबत विलंबाने रिपोर्ट पाठविणे/चुकीचा रिपोर्ट देणे/रिपोर्टच न देणे ह्यासंबंधाने दंडात्मक व्याज आकारणी करण्याबाबतची सर्व विद्यमान परिपत्रके/मार्गदर्शक तत्वे रद्दबातल करुन हे परिपत्रक देण्यात आले आहे.

**१) करन्सी चेस्ट व्यवहारांबाबत विलंबाने रिपोर्ट पाठविणे/चुकीचे रिपोर्ट देणे/रिपोर्टच न पाठविणे.**

**अ) करन्सी चेस्ट व्यवहारांचे रिपोर्टिंग**
करन्सी चेस्टमध्ये जमा करण्याची/त्यामधून निकासी करण्याची किमान रक्कम रु १,००,०००/- एवढी असेल व त्यांनंतर रु ५०,०००/- च्या पटीमध्ये असेल.

**ब) अहवाल पाठविण्याची कालमर्यादा**

१) करन्सी चेस्ट्सनी, त्याच दिवशी रात्री ९ वाजेपर्यंत, सिक्युअर्ड वेबसाईट (एसडब्ल्युएस) वर डेटा अपलोड करुन, आयसीसीओएमएसमार्फत, सर्व व्यवहार, न चुकता, त्यांच्या संबंधित लिंक ऑफिसेसकडे पाठविले पाहिजेत. आणि लिंक ऑफिसांनी अशी एकत्रित स्थिती त्यांच्या इश्यु ऑफिसेसकडे त्याच दिवशी, रात्री ११ वाजेपर्यंत कळविली पाहिजे.

२) सब-ट्रेझरी ऑफिसांनी सर्व व्यवहार त्याच दिवशी रात्री ११ वाजेपर्यंत रिझर्व बँकेच्या इश्यु ऑफिसकडे थेट पाठवावेत.

**क) बँकांमधील संप-काळाबाबत सवलत**

सर्वसाधारण/विशिष्ट कारणामुळे संप-परिस्थिती उद्भवल्यास अहवाल कळविण्याच्या कालावधीतील सवलत, प्रत्येक प्रकरणानुसार ठरविण्यात येईल.

**ड) विलंबासाठी दंडात्मक व्याज आकारणी**

१) करन्सी चेस्ट व्यवहार कळविण्यात विलंब झाल्यास, ह्या परिपत्रकाच्या परिच्छेद ३ मध्ये दिलेल्या व्याजदराने, चेस्ट ठेवणाऱ्या बँकेकडून येणे असलेल्या रकमेवर दंडात्मक व्याज, विलंबकालासाठी आकारले जाईल. दंडात्मक व्याज टी + ० धर्तीवर काढले जाईल. म्हणजे, लिंक ऑफिसने, त्याच व्यवहाराच्या दिवशी, रात्री ११ वाजेपर्यंत, इश्यु ऑफिसला न कळविलेल्या व्यवहारांबाबत दंडात्मक व्याज काढले जाईल. तथापि, असे दंडात्मक व्याज आकारण्याबाबत, रिझर्व बँक, तिला तसे वाटल्यास सुयोग्य वाढीव मुदत देऊ शकते.

२) त्या मंडलाच्या इश्यु विभागाशी थेट संलग्न असलेल्या, सिंगल चेस्ट/एसटीओंबाबत, चेस्ट स्लिप्स सादर करण्यामधील विलंबासाठीही दंडात्मक व्याज आकारले जाईल.

**ई) चुकीचा रिपोर्ट देणे आणि दंडात्मक व्याज आकारणी**

रिझर्व बँकेला सुधारलेला ॲडव्हाईस मिळण्याच्या तारखेपर्यंत, चुकीच्या रिपोर्टिंगच्या सर्व प्रकरणांना त्याच प्रकारे दंडात्मक व्याज लावले जाईल. लिंक ऑफिस स्टेटमेंटमध्ये कळविण्यात आलेल्या आकड्यांवर आधारित अशा रितीनेच, बँकेच्या चालु खात्यात क्रेडिट/डेबिट दाखविले जात असल्याने, चेस्ट स्लिप्समध्ये योग्य रिपोर्टिंग करण्यात आले असले तरीही, लिंक ऑफिस स्टेटमेंट्समध्ये चुकीचे रिपोर्टिंग केल्या जाण्याच्या सर्व बाबतीत दंडात्मक व्याज लावले जाईल. संबंधित करन्सी चेस्टद्वारे कळविले गेलेले आकडे बरोबर आहेत ह्याची खात्री लिंक ऑफिसेस करुन घेतली अशी आशा आहे**. लिंक ऑफिसेसच्या विवरणपत्रांमध्ये, नवीन नोटा/करन्सी चेस्टला पाठविलेल्या नोटांचे प्रेषण हे "ठेव/जमा" व्यवहार म्हणून कळविले जाणार नाही ह्याची विशेष काळजी घेतली जावी.**

**फ) आकारवयाचे कमाल दंडात्मक व्याज**

चुकीच्या/विलंबाने केलेल्या रिपोर्टिंगसाठी आकारवयाच्या दंडात्मक व्याजाच्या कमाल रकमेबाबत कोणतीही अट नाही. चेस्ट व्यवहारांचे रिपोर्टिंग वक्तशीर व बिनचुक व्हावे हा उद्देश असल्याने, संबंधित व्यवहाराची रक्कम/जवळच्या रुपयापर्यंत राउंडिंग केलेली दंडात्मक व्याजाची रक्कम कितीही असली तरी लागु असलेल्या सर्व प्रकरणात दंडात्मक व्याज वसुल केले जाईल.

**२) करन्सी चेस्टच्या शिल्लकेमध्ये अपात्र रकमांचा समावेश करण्याबाब्त दंडात्मक व्याज**

अ) चुकीचे रिपोर्टिंग/विलंबाने केलेले रिपोर्टिंग/रिपोर्टिंग न करणे ह्यामुळे एखाद्या बँकेच्या रिझर्व बँकेमधील चालु खात्यात तिने "अपात्र" क्रेडिटचा लाभ मिळाला असल्यास अशा सर्व प्रकरणा दंडात्मक व्याज आकारले जाईल

ब) ह्याशिवाय, संयुक्त-परिरक्षकांच्या ताब्यात असलेली व त्यांना "मुक्तपणे उपलब्ध" असलेली रोख रक्कमच चेस्ट बॅलन्सेसमध्ये समाविष्ट करण्यास पात्र आहे. म्हणजे, कोणत्याही कारणाने सीलबंद लिफाफ्यात सेफ कस्टडीमध्ये ठेवलेली रोकड/संयुक्त परिरक्षक सोडून अन्य अधिकांऱ्यानी, ट्रंका/पेट्यांमध्ये कुलुपबंद करुन ठेवलेली रोकड किंवा संयुक्त परिरक्षकांनी दोन कुलुपे लावण्याव्यतिरिक्त कोणत्याही अधिकाऱ्याने तिसरे कुलुप लावून कुलुपबंद केलेल्या पेटीतील रोकड चेस्ट बॅलन्सेसमध्ये समाविष्ट करण्यात पात्र असणार नाही अशा रकमा चेस्ट बॅलन्सेसमध्ये समाविष्ट केल्या गेल्यास, त्यांना चुकीचे रिपोर्टिंग केल्याचे समजले जाईल आणि त्यांना परिच्छेद ३ मधील दंडात्मक व्याज लागु होईल.

क) वरील प्रकरणात अशा "अपात्र" रकमा चेस्ट बॅलन्सेसमध्ये समाविष्ट केल्या गेल्याच्या तारखेपासून ते त्या त्यातून काढून टाकेपर्यंतच्या काळासाठी दंडात्मक व्याज आकारले जाईल.

**३) दंडात्मक व्याजाचा दर**

विलंबाने/चुकीचे रिपोर्टिंग/रिपोर्टिंग न करणे/चेस्ट बॅलन्सेसमध्ये अपात्र रकमा समाविष्ट करणे ह्याच्या काळासाठी, चालु बँकदरापेक्षा २ % अधिक दराने दंडात्मक व्याज आकारले जाईल.

**४) राजकोषामधील करन्सी चेस्टच्याबाबत दंडात्मक व्याज-आकारणी**

राजकोष/उपराजकोषामधील करन्सी चेस्टनाही वरील सूचना लागु असतील.

**५) प्रतिनिधित्व (रिप्रेझेंटेशन्स)**

अ) <u>विलंबाने केलेल्या रिपोर्टिंगसाठी</u> दंडात्मक व्याज आकारण्यासाठी विलंब झालेल्या दिवसांची संख्या हा एकमेव मुद्दा असल्याने, वैय्यक्तिक प्रकरणांमधील रिझर्व बँकेने दिलेल्या निर्णयांवर पुनर्विचार करण्याची विनंती करण्यास बँकांना

सर्वसाधारणतः वाव असू नये. तथापि, खासकरुन डोंगराळ/दूरवरच्या प्रदेशातील चेस्टना आलेल्या व नैसर्गिक आपत्तींमुळे आलेल्या अडचणींसाठी, त्या बँकेचा मुख्य/नियंत्रक कार्यालयामार्फत संबंधित इश्यु ऑफिसकडे याबाबत रिप्रेझेंटेशन केले जाऊ शकते.

ब) चुकीचे रिपोर्टिंग केले गेल्यास सूट देण्याबाबतच्या रिप्रेझेंटेशन्सचा विचार केला जाणार नाही (वरील परिच्छेद १(ई) शी तुलना करा).

क) दंडात्मक व्याज लावण्याचा उद्देश लगेच योग्य रिपोर्टिंग करण्यासाठी बँकांमध्ये शिस्त यावी हा असल्याने, असे विलंबाने/चुकीचे रिपोर्टिंग/रिपोर्टिंग न करणे ह्यामुळे रिझर्व बँकेचा निधी वापरला गेला नाही किंवा त्यामुळे सीआरआर/एसएलआर कमी झाला नाही किंवा त्या कारकुनी चुका, अजाणता किंवा गणितीय चुका होत्या, पहिल्यांदाच चूक झाली आहे, कर्मचारी अननुभवी आहेत इत्यादी कारणे दंडात्मक व्याजापासून सूट देण्यासाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

६) हे महापरिपत्रक www.rbi.org.in ह्या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

आपला विश्वासु

(बी.पी.विजयेंद्र)

मुख्य महाव्यवस्थापक